पुण्य नगरी

नळेगावात सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळा

नळेगाव : डिजिटल युगात विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षण व प्रशिक्षण प्रकल्पांतर्गत अलफारुख उर्दू विद्यालय, नळेगाव येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली.

सायबर वॉरियर्स जान्हवी सोरटे व जोहा कोतवाल यांनी फिशिंग, मजबूत पासवर्ड तयार करणे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, ऑनलाइन फसवणूक ओळखणे आणि डिजिटल पेमेंट करताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. सायबर गुन्हा घडल्यास राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधून अधिकृत पोर्टलवर तक्रार नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यशाळेला मुख्याध्यापक वहाब जागीरदार, कादीर जागीरदार उपस्थित होते.

Latur Edition
Aug 10, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com